**कृपया आपले स्तरावरून विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्वरीत कळवावे.**

**विविध कृषि पुरस्कारांबाबत**
**मार्गदर्शक सुचना २०१६-१७**

जा.क्र.कृमावि/विप्र-४/कृषि पुरस्कार/मा.सु/५३५/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक :-०३/०९/२०१६

**प्रति,**
**विभागीय कृषि सहसंचालक**
**---------विभाग------**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-२१९१/प्रक्र.१०४/११अे, दि.३० सप्टेंबर १९९१
२) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-१०९३/३५२९१/सीआर-१९७/११अे, दि.२० मे १९९४
३) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-१००३/प्रक्र.५२/११अे, दि.२२ ऑगस्ट २००३
४) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-१२०७/प्रक्र.१(भाग-२)/११अे, दि.२३ जून२००८
५) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-२०१३/प्रक्र.१७८/११अे, दि.०६ सप्टेंबर २०१४

**विषय :-सन २०१६ करीता डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण ,जिजामाता कृषिभूषण आणिवसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कारांकरीता शेतकरी निवड आणि प्रस्ताव सादर करणेबाबत................**

दरवर्षी राज्यात कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी,कृषि पत्रकार, गट तसेच संस्था यांना विविध पुरस्काराने गौरविण्यात येते.उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयांच्या अधिन राहून परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत कार्यपध्दती आणि मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे राहतील.

## १. डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार :

डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार हा राज्याच्या कृषि विभागामार्फत दिला जाणारा सर्वोच्च पुरस्कार आहे.या पुरस्कारासाठी निवड होणाऱ्या व्यक्ति / गट /संस्थेस रु.७५०००/- रोख रकमेचे पारितोषिक, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार असे स्वरुप आहे.

**निकष –**

१) हा सर्वोच्च पुरस्कार दरवर्षी फक्त एकाच व्यक्ति/ गट/संस्थेस देण्यात येतो त्याअनुषंगाने व्यक्ती/गट/संस्था यांचे कार्य अतिउल्लेखनिय असावे.

२) सर्वसाधारणपणे मागील २०-२५ वर्षाचा शेतीचा अनुभव असलेल्या व्यक्ती/ गट/ संस्थेला प्राधान्य द्यावे.

३) व्यक्ती /गट/संस्थेचे कृषि उत्पादन / उत्पन्न , कृषि विस्तार, निर्यात,कृषि प्रक्रीया,पीकफेरबदल, कृषि उत्पादन वाढीसाठी वापरलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान, त्यामधील त्यांचे कार्य तसेच समाजातील स्थान याबाबत सर्वंकष विचार करावा.

४)कोरडवाहू क्षेत्रातील कार्य आणि कोरडवाहू तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर करणे आवश्यक.

५) सदर पुरस्कारार्थीच्या शेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमांचा इतर शेतकऱ्यांना होणारा फायदा

६) कृषि विपणन, प्रक्रिया, काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब, याबाबतचेकार्य इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शक असावे.

७) कृषि क्षेत्रातीलकार्य संघटनात्मक आणि संपूर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

८) शासकीय किंवा शासन अंगीकृत वा सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/संस्था पात्र असणार नाही.

९) शासनाकडून यापूर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

१०) प्रस्तावीत शेतकरी /गट/संस्था शेतकरी मासिकाचे सभासद असावेत.

## २) वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार :

कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ तसेच कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास, फलोत्पादन, ग्रामीण विकास इ.क्षेत्रात अद्वितीय कार्य करणाऱ्या शेतकरी गट/संस्थेला वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते.या पुरस्कारार्थीला रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक, स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र आणि पुरस्कार प्राप्त व्यक्तिचा सपत्निक सत्कार असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष :-**

१)कृषि क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणारे शेतकरी/गट/संस्था असावेत आणि त्यांचे कार्य संपुर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

२) प्रस्तावित शेतकरी हा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी असावा.

३) शासनाकडून यापूर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

४)शासकीय किंवा शासन अंगीकृत वा सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/गट/ संस्था पात्र असणार नाही.

५) प्रस्तावीत शेतकरी /गट/संस्था शेतकरी मासिकाचे सभासद असावेत.

## ३)जिजामाता कृषिभुषण पुरस्कार :-

राज्यातील शेती क्षेत्राची सातत्याने होत असलेली प्रगती व या प्रगतीत उत्पादन वाढीत महिलांचाही फार मोठा वाटा आहे व तो सातत्याने वाढत असुन, शेती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीत महिला सातत्याने पुढे येत आहेत. शेती विकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची बाब आहे. तसेच शेती क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा व अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर महिलांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातुन दरवर्षी पाच (५) महिला शेतक-यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. पुरस्कारार्थी महिलांना प्रत्येकी रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) रोख रकमेचे पारितोषिक, स्मृतीचिन्हे, सन्मानपत्र आणिपतीसह सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष :-**

१) कृषि क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणाऱ्या महिला शेतकरी असाव्यात आणि त्यांचे कार्य संपुर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

२)प्रस्तावीत महिला शेतकरीही वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी असावी.

३) शासनाकडून यापूर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

४)शासकीय किंवा शासन अंगीकृत वा सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/संस्था पात्र असणार नाही.

५)प्रस्तावीत महिला शेतकरी ही शेतकरी मासिकाचे सभासद असावी.

## ४) वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार :-

जे शेतकरी त्यांच्या कृषि ज्ञानाचा फायदा त्यांच्या परिसरातील इतर शेतक-यांना देतील आणि शेती उत्पादन वाढविण्यास शेतक-यांना मार्गदर्शन किंवा प्रोत्साहित करतील, तसेच इतर व्यक्ती /संस्था ज्या स्वतः शेती करीत नाहीत किंवा ज्यांची स्वतःची शेती नाही. परंतु पत्रकारीतेव्दारे किंवा इतर अन्य मार्गाने या क्षेत्रात बहुमोल कामगिरी करतात अशा शेतक-यांना/ व्यक्तींना / संस्थांना, त्याचप्रमाणे कृषि क्षेत्राशी संलग्न घरगुती उद्योग उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, गांडुळशेती इत्यादीमधील वैशिष्टपुर्ण कामगिरी करणा-या व्यक्ती तसेच खेडयांमधुन परसबाग वृध्दींगत करणा-या महिला, कृषि विकास मंडळ ज्या गावात सक्रिय आहे. अशा मंडळाचे क्रियाशील सभासद / प्रमुख, इत्यादी व्यक्ती / गट / संस्था / शेतकरी यांना राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत वसंतराव नाईक शेतीमित्र हा बहुमान प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.रुपये. ३०,०००/- रोख रक्कम,स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र,आणि सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष :**

१) कृषि क्षेत्रातील कार्य संघटनात्मक आणि संपूर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

२) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकार संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/संस्था पात्र असणार नाही.

३) खेडयामधुन परसबाग वृध्दींगत करणाऱ्या महिलांचाही विचार या पुरस्कारासाठी करण्यात यावा.

४) कृषि विज्ञान मंडळ किंवा शेतकरी उत्पादक कंपन्या ज्या गावात सक्रिय आहे त्या मंडळाच्या/कंपन्यांच्या क्रियाशील सभासंदाचा/प्रमुखांचा विचार या पुरस्कारासाठी करण्यात यावा.

५) कृषिविषयक दैनिक/साप्ताहिक/मासिकामधुन लिखाणाद्वारे किंवा विविध स्तरावरील शेतकरी मेळावे/चर्चासत्र/प्रदर्शन इ.माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारी व्यक्ति/संस्था यांचा विचार या पुरस्कारासाठी करण्यात यावा.

६) शासनाकडून यापूर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

७) शासनाच्या कृषि विभागामार्फत तसेच आत्मा अंतर्गत राबविण्यात आलेल्या शेतीशाळांमधील सुलभकर्ता समन्वयक, शेतकरी यांचाविचार या पुरस्कारासाठी करता येईल.

## विविध पुरस्कारासाठी प्रस्ताव तयार करणे आणि सादर करणेबाबत कार्यपध्दती :

१) उत्स्फुर्त आणि नाविन्यपुर्ण पुरस्कारार्थीचे जास्तीत जास्त आणि दर्जात्मक प्रस्ताव जिल्हास्तरावर प्राप्त होणेकरीता तालुकास्तरावर मंडल कृषि अधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय,तालुका कृषि अधिकारी कार्यालययांचे मार्फतच प्रस्ताव सादर करावेत.

**२) मार्गदर्शक सुचना प्राप्त होताच विभाग स्तरावरुन प्रादेशिक वर्तमानपत्र,आकाशवाणी,आणि दुरदर्शन इ.माध्यमाव्दारे विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी देऊन खाली दर्शविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व निकषानुसार पात्र पुरस्कारार्थीचे जास्तीत जास्त प्रस्ताव तालुका पातळीवरुन येतील याबाबत नियोजन करावे.**

३)उपरोक्त कृषि पुरस्काराकरीता पुढीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करुन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी .

**अ)** तालुका स्तरावरुन ३१ डिसेंबर २०१६ पुर्वी सर्व प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस सादर करावे.

**ब)** जिल्हास्तरीय समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी व त्या अनुषंगीकबाबींची पुर्ततेचीकार्यवाही करुन घेउन प्रस्ताव ३१ जानेवारी २०१७ पर्यंत विभागीय स्तरीय समितीकडे सादर करावेत.

**क)** विभागस्तरीय समितीने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिफारस केलेले परिपुर्ण प्रस्ताव विभागस्तरीय समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तासह कृषि आयुक्तालयास खास दुतामार्फत एकत्रितपणे १५ मार्च २०१७पर्यंत सादर करावेत.

३) जिल्हास्तरावरील समितीने पुरस्कारार्थीच्या प्रक्षेत्रास संयुक्तपणे समक्ष भेट देऊन शिफारशींसह प्रस्ताव विभागीयस्तरावरील समितीकडे पाठवावा.

४) विभागीयस्तरावर प्राप्त होणाऱ्या एकूण प्रस्तावांपैकी काही पुरस्कारार्थीच्या प्रक्षेत्रास विभागीयस्तरावरील समितीने समक्ष भेट देऊन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन शिफारशींसह प्रस्ताव आयुक्तालयास पाठविण्यांत यावेत.

५) प्रत्येक पुरस्काराकरीता संबंधित सहपत्रित केलेल्या प्रपत्रातील माहितीसह पूर्णतः भरल्याची आणि सर्व संबंधितांच्या स्वाक्षरी असल्याची खात्री करुनच प्रस्ताव आयुक्तालयास सादर करावेत.

६) प्रस्तावीत शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीतच सादर करणे आवश्यक आहे.

७)प्रस्तावीत शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

८) प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये ७-१२,८-अ,मुळप्रतीत जोडणे अनिवार्य राहील अपवादात्मक स्थितीत संस्था किंवा गट किंवा काही शेतिमित्र प्रस्तावाचे बाबतीत ७-१२,८-अ ऐच्छीक राहील.

९) यापूर्वी मिळालेल्या पुरस्कारांचा वर्षासह तपशिल द्यावा तसेच त्यांच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्रस्तावासोबत जोडाव्यात.

१०) आयुक्तालयास प्रस्ताव सादर करताना संबंधितांचे दोन पासपोर्ट साइज फोटो स्टेपल न करता तसेच फोटोच्या मागे शेतकऱ्याचे संक्षिप्त नाव व मोबाइल नंबर नमुद करून लिफाप्यामध्ये सादर करावे.

११) डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार प्रस्ताव छाननी आणि निवडीकरीता विविध स्तरावरील समित्यांची रचना–

**जिल्हास्तर – जिल्हा स्तरीय निवड समिती :-**

| | |
|---|---|
| १)जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २)जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| ३)प्रकल्प संचालक (आत्मा) | सदस्य |
| ४)कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

**विभागस्तर – विभागीय स्तरावरील समिती :-**

| | |
|---|---|
| १) विभागीय कृषि सह संचालक | - अध्यक्ष |
| २) विभागीय सह संचालक (पशुसंवर्धन) | -सदस्य |
| ३) जिल्हा मुख्यालयाचे जिल्हा कृषि विकास अधिकार | - सदस्य |
| ४) विभागीय पणन अधिकारी | -सदस्य |

५) संबंधित कृषि विद्यापीठाचे संचालक (विस्तार) -सदस्य
६) अधिक्षक कृषि अधिकारी (वि.कृ.स.सं.यांचे कार्यालय) - सदस्य सचिव

**आयुक्तालयस्तर - आयुक्तालय स्तरावरील समिती**

१)आयुक्त कृषि - अध्यक्ष
२) आयुक्त पशुसंवर्धन - सदस्य
३) व्यवस्थापकीय संचालक (महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ) - सदस्य
४) कृषि संचालक(विस्तार व प्रशिक्षण) - सदस्य
५) कृषि संचालक(फलोत्पादन) - सदस्य
६)कृषि संचालक(मृद्संधारण) - सदस्य
७) कृषि संचालक(आत्मा) - सदस्य
८) कृषि संचालक(गुणनियंत्रण) - सदस्य
९) संचालक महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद - सदस्य
१०) संबंधित कृषि सहसंचालक(विस्तार व प्रशिक्षण) - सदस्य सचिव

१३) मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचेकडूनही काही व्यक्तींची शिफारस करण्यात येते.तसेच विभागाचे सचिव व विभागीय आयुक्त यांचेकडून काही व्यक्तींची शिफारस करण्यांत येते. अशा प्रकारे शासनाकडून शिफारस केलेले प्रस्ताव कृषि आयुक्तालयास प्राप्त होतात. माहिती विहित प्रपत्रात नसल्यामुळे त्या व्यक्तींची माहिती विहित प्रपत्रात प्राप्त करुन घेण्यासाठी व वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी सदर प्रस्ताव अभिप्रायासाठी आपणाकडे पाठविण्यांत येतील. अशा परस्पर प्राप्त प्रस्तावाची छाननी जिल्हा व विभागीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत करावी. पुरस्कारार्थीच्या कामाबाबत व त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा उल्लेखनिय का आहे, याबाबत समितीने अभिप्राय द्यावेत.

**टिप :-१.सदरच्या मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.**
**२.प्रस्तावाची फक्त मूळप्रत कृषि आयुक्तालयास पाठविण्यात यावी, व उर्वरीत प्रती जिल्हा व विभाग स्तरावर जतन करून ठेवाव्यात.**

स्वाक्षरीत/-

**सोबत : प्रपत्र अ, ब व क**

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :माहितीसाठी सविनय सादर.**

**१.** मा. अपर मुख्यसचिव (कृषि), कृषिविभाग,मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.आयुक्त, पशुसंवर्धन

**प्रत :माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,...................... (सर्व)
२. प्रकल्प संचालक (आत्मा)........................(सर्व)
३. कृषि विकास अधिकारी, जि.प......................(सर्व)

**प्रपत्र  अ-सर्वसाधारण माहिती**

| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्तीचे संपूर्ण नांव | |
| २ | कायमचा पत्ता ( संपूर्ण पत्ता दयावा) | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता | |
| ४ | अ. दुरध्वनी  क्रमांक  (एस.टी.डी. कोडसहीत)<br>ब. भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नंबर) | |
| ५ | अ. ई-मेल<br>ब. वेबसाईट | |
| ७ | शिक्षण | |
| ८ | व्यवसाय | |
| ९ | शेतकऱ्याचा आधार कार्ड क्रमांक व बँकेचा खाते क्रमांक | |
| १० | त्यांना शासन / शासन पुरस्कृत संस्थेमार्फत पगार / पेन्शन मिळते काय ?(रु. १०० च्या स्टँपवर शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसलेबाबत प्रतिज्ञापत्र) | |
| ११ | पूर्वी मिळालेला सन्मान/पुरस्कार आणि कोणत्या वर्षी व कशासाठी. (प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह ) | |
| १२ | चारित्र्य कसे आहे (सोबत जि.पो.अ.दाखला मुळप्रत असावी) | |
| १३ | वरील व्यक्तीचे केलेले काम सर्वसामान्य शेतक-यांना उपयोगी मार्गदर्शक कसे तसेच त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा उल्लेखनिय कसे याबाबत सविस्तर माहिती. | |
| १४ | परिचय लेख (सोबत स्वतंत्र देण्यात यावा). | |
| १५ | माहिती तंत्रज्ञानाचा कृषि विकासाकरीता वापर करतात का ? कशाप्रकारे करतात ? | |
| १६ | कृषि विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष शेतीस भेट देऊन प्रस्ताव निकषाप्रमाणे योग्य असल्यास शिफारशीसह अभिप्राय द्यावेत. | |

**सही/-**

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद

**सही/-**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
जिल्हा

**प्रपत्र  ब- उल्लेखनिय कार्याबाबतची माहिती**

| | | |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्याचे नांव व पत्ता | |
| २ | धारण केलेले एकूण क्षेत्र हे. ( ८ अ प्रमाणे) | |
| ३ | फळबाग लागवडीचे क्षेत्र हे. (फळपिक निहाय) | |
| ४ | जमिनीचा विकास (मृद - जल संधारणाचे उपचारीत क्षेत्र ) | |
| ५ | कंपोस्ट/ हिरवळीचे / गांडूळ खताचा वापर | |
| ६ | ॲझो / रायझो/ पीएसबी/ उतीसंवर्धन यांचा वापर | |
| ७ | मातीचे नमुने तपासून त्याप्रमाणे रासायनिक खतांचा वापर | |
| ८ | एकात्मिक पीक संरक्षण  कार्यक्रमाचा अवलंब | |
| ९ | कृषि विद्यापीठे, कृषि प्रतिष्ठान व तत्सम संस्थांना भेटी देऊन तेथील तंत्रज्ञानाचा अवलंब | |
| १० | सिंचनाच्या पाण्याचा किफायतशीर वापर / ठिबक / तुषार वापर करतात काय? | |
| ११ | स्वतः विकसित केलेले तंत्रज्ञान | |
| १२ | सहकार ग्रामीण विकास, कृषि फलोत्पादन, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय  क्षेत्रातील कार्य | |
| १३ | वृत्तपत्र लेख/ कृषि साहित्य इ. मार्गाने  केलेले कार्य | |
| १४ | व्यक्ति / संस्थेची प्रकाशने | |
| १५ | सामाजिक कार्य | |
| १६ | कृषि माल निर्यात प्रक्रिया / निर्यातीसंदर्भात केलेले कार्य | |
| १७ | पाणलोटक्षेत्र व्यवस्थापनातील केलेले कार्य सविस्तर माहिती द्यावी . | |
| १८ | कृषि व कृषि संलग्न उपक्रम राबविणारी  संस्था असल्यास, संस्थेचे कार्य, संस्थेमार्फत शेतक-यानां शेतकरी  प्रशिक्षणदिले जाते काय ? | |
| १९ | पर्यावरण वाचविण्यासाठी केलेले भरीव कार्य | |
| २० | आदिवासी क्षेत्रासाठी केलेले उत्कृष्ट कार्य | |
| २१ | देशातंर्गत व परदेश दौऱ्याबाबतची माहिती<br>अ. देशाचे नाव व वर्ष<br>कोणत्या तंत्रज्ञानाची पाहणी केली व त्याचा अवलंब कसा केला? | |

| | | |
|---|---|---|
| २२ | मान्यता प्राप्त आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी केलेले कार्य | |
| २३ | एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करतात काय? (थोडक्यात माहिती द्यावी) | |
| २४ | राबविण्यात येत असलेले नाविन्यपुर्ण प्रकल्प/उपक्रम | |
| २५ | उत्पादीत मालाच्या मुल्यवृध्दी व विक्रीसाठी करण्यात येत असलेल विशेष प्रयत्न | |
| २६ | उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी कृषि व संलग्न क्षेत्रातील विविध योजनांचा घेतलेला लाभ व त्याची परिणामकारकता | |
| २७ | नांमाकित संस्थेचा सदस्य आहे काय? असल्यास त्याच्या कामाचे स्वरुप व केलेले कार्य | |

**सही/-**
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद

**सही/-**
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
जिल्हा

### प्रपत्र क

### कृषिरत्न, कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण व शेतीमित्र पुरस्कारांकरीता कार्य विवरण

**प्रस्तावित पुरस्कार -**

| अ. क्र. | व्यक्तीचे / संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता (सर्वश्री) | जिल्हा | पूर्वी मिळालेले पुरस्कार | कार्यविवरण ( उल्लेखनीय बाबी , क्षेत्र इ. ) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |